गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..
दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS
वर्ष १ ले | अंक ३३४ वा | बुधवार २४ एप्रिल २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-
| * Volume 1 | Issue 334 | Date : 24/04/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## तीन लोकसभा जागांवर उभे राहिलेले व्यंकटेश्वरा महास्वामी अडचणीत; गुन्हा दाखल होणार



सोलापूर/प्रतिनिधी : लोकसभा निवडणुकीसाठी एकाचवेळी कमाल दोन मतदारसंघात उभे राहण्याची मर्यादा असताना सोलापूर लोकसभेसाठी उमेदवारी दाखल केलेले कर्नाटकातील दीपक कटकधोंड ऊर्फ व्यंकटेश्र्वरा महास्वामीजी यांनी सोलापूरशिवाय अमरावती आणि नागपूरमध्येही उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्याची दखल घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला जाणार असल्याचे जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

व्यकटेश्र्वरा महास्वामीजींनी सोलापूरसह अमरावती आणि नागपूरमध्ये अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तसेच कर्नाटकातील विजयपुरातही त्यांनी उमेदवारी भरल्याची माहिती समोर आली आहे. त्याची पडताळणी केली जात आहे. एका उमेदवाराला जास्तीत जास्त दोन मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची कायदेशीर । पान २ वर

## १३ राज्यांत लोकसभेच्या ८९ जागांसाठी शुक्रवारी मतदान

### लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रचार आज संपणार

नवी दिल्ली: लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील प्रचार बुधवारी, २४ एप्रिल रोजी संपणार असून या टप्प्यात पश्रिचम उत्तर, राजस्थान, बेंगळुरू शहरातील मतदारसंघांमध्ये इतर मुद्द्यांसह ध्रुवीकरणाचा मुद्दाही कळीचा ठरू शकेल. त्यामुळेही



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यस्थान व उत्तर प्रदेशमधील प्रचारसभांमध्ये काँग्रेसच्या जाहीरनाम्यावरून हिंदू-मुस्लिम मुद्दा ऐरणीवर आणल्याचे मानले जात आहे.

पश्रिचम बंगालमध्ये निवडणूक प्रचारामध्ये पहिल्या टप्प्यापासून ध्रुवीकरण झालेले पाहायला मिळाले आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये बालुरघाटमधून भाजपचे प्रदेशाध्यक्ष सुकांता मुजुमदार पुन्हा लढत आहेत. बिहारमधील पूर्णियात नुकतेच काँग्रेसवासी झालेले पप्पू यादव यांनी बंडखोरी केली आहे. जागावाटपात पूर्णिया राष्ट्रीय जनता दलाला मिळाले. पण, पूर्णियावरील हक्क पप्पू सोडायला तयार नसल्यामुळे काँग्रेसची पंचाईत झाली आहे.

छत्तीसगढमधील राजनंदगाव मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री व काँग्रेसचे उमेदवार भूपेश बघेल पुन्हा लोकसभेच्या रिंगणात उतरले आहेत.

कर्नाटकमध्ये दक्षिण बेंगळुरूमध्ये भाजपचे वादग्रस्त नेता तेजस्वी सूर्या लढत आहेत. बेंगळुरू उत्तरमध्ये केंद्रीय राज्यमंत्री शोभा करंदळजे यांच्याविरोधात काँग्रेसचे कर्नाटकमधील मंत्री राजीव गौडा, बेंगळुरू ग्रामीणमध्ये कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचे बंधू डी. के. सुरेश लढत आहेत. मंड्यामध्ये जनता दलाचे (ध) नेते एच. डी. कुमारस्वामी तर, म्हैसूरमधून राजघराण्यातील यदुवीर वडियार रिगणात आहेत.

केरळमध्ये राहुल गांधींमुळे वायनाडमधील लढत लक्षवेधी ठरली असून भाकपच्या । पान २ वर

## मोदींच्या विरोधात लोकांमध्ये रोष असल्यानेच आता भाजपा हिंदू-मुस्लिम

### शरद पवार यांची पंतप्रधान नरेंद्र मोदींवर जोरदार टीका

पुणे : महाराष्ट्रात आणि देशात नरेंद्र मोदींना विरोध प्रचंड वाढतो आहे. लोकांना आता मोदी नको आहेत तर बदल हवा आहे. त्यामुळेच भाजपाकडून हिंदू-मुस्लिम वाद निर्माण केला जातो आहे असा आरोप शरद पवार यांनी केला आहे. सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेलं भाषण हे लाज वाटण्यासारखं होतं. एका समाजाबाबत ते इतकं वाईट बोलतात? त्यामुळे देशात विद्वेष वाढेल अशी स्थिती आहे असंही शरद पवार म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज हे वेगळे राजे होते. साडेतीनशे वर्षे उलटून गेली तरीही छत्रपती शिवराय लोकांच्या मनात घर करुन आहेत. त्यांनी जे राज्य केलं ते एका जातीचं किंवा जमातीचं नव्हतं. त्यांनी कधीही भोसलेंचं राज्य आहे असं म्हटलं नाही. असं शरद पवार म्हणाले.महागाईचा सर्वात मोठा प्रश्र्न नरेंद्र मोदींच्या कार्यकाळात लोकांसमोर आहे. नरेंद्र मोदींनी सांगितलं होतं की सहा महिन्यात महागाई दूर करतो. मात्र परिस्थिती जैसे थे आहे. गॅस सिलिंडरची किंमत वाढली आहे. मोदींच्या कार्यकाळात महागाई कमी झाली नाही तर वाढली आहे. जगातल्या एका मोठ्या संख्येने बेकारी आणि बेरोजगारीचा अभ्यास केला त्यात ८६ टक्के तरुम बेरोजगार आहेत. मग मोदींची गॅरंटी आहे तरी काय? असा प्रश्र्नही शरद पवार यांनी विचारला.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला घटना दिली आहे. ही घटना सध्याच्या घडीला संकटा आहे. मोदी यांच्या जवळचे लोक म्हणतात पुन्हा सत्तेत आल्यास आम्हाला घटना बदलायची आहे. घटना बदलण्यासाठीच आम्हाला ४०० पार जायचं आहे. शिवाय काहीही झालं तरीही भाजपाचे लोक हिंदू मुस्लिम समाजाबाबत बोलू लागतात. सोमवारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी जे भाषण केलं ते भाषण लाज वाटण्यासारखं होतं. पंतप्रधान पदी बसलेला माणूस एका समाजाबाबत इतकं वाईट कसं काय बोलू शकतो? मोदींच्या विरोधात रोष असल्यानेच हे सगळं चाललं आहे. असं शरद पवारांनी म्हटलं आहे. रायगडच्या सभेत त्यांनी मोदींवर ही टीका केली आहे.

## माढा मतदारसंघात खा. शरद पवार स्वत:मैदानात उतरणार

पंढरपूर/प्रतिनिधीः माढा लोकसभा मतदारसंघातील सुरू असलेले अनेक किडे सुटत चाललेले आहेत उमेदवार महाविकास आघाडीतील उमेदवार निवडीची चर्चा संपली आहे आता या मतदारसंघ भाजपकडून खेचून घेण्यासाठी खासदार शरद पवार स्वतः मैदानात उतरणार असून माढा मतदार संघासाठी तब्बल सहा दिवस सहभाग घेण्याचे महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून जाहीर मोहिते पाटील हे मैदानात उतरले आहे त्यांच्यासाठी अनेक अडचणी होत्या त्या अडचणी दूर करण्यात खासदार शरद पवार यांनी आपली चाणक्य नीति वापरत उमेदवाराला भरती आणून दिली आहे



खा. शरद पवार यांच्या जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून ते पुढील प्रमाणे बुधवारी २४ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता मोडली मिळतील मार्केट कमिटी मैदानात शुक्रवारी २६ एप्रिल रोजी करमाळा मार्केट कमिटी सकाळी दहा वाजता त्याच दिवशी दुपारी दोन वाजता सांगोला येथे सभा होणार आहे शनिवारी २७ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता दहिवडी मंगळवारी ३० एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता फलटण गुरुवारी दोन मे रोजी सकाळी दहा वाजता अकलूज येथे भव्य जाहीर सभा होणार आहे.वरील सर्व सभा माढा लोकसभा मतदारसंघातील प्रमुख ठिकाणी होणार आहे त्यावरून धहेलकील मोहिते पाटील यांच्यासाठी स्वतः खासदार शर्यचंद्र पवार यांनी पाच दिवसात सहा सभा होणार आहे या महाविकास आघाडीतील सर्वप्रमुख नेते मंडळी उपस्थित राहणार आहेत तरी कार्यक्रम कार्यकर्त्यांनी अगदी वेळेवर उपस्थित राहावे असे आव्हान उमेदवार दहिसर मोहिते पाटील यांनी केले आहे

## पंतप्रधान मोदी यांची २९ एप्रिल रोजी सोलापूरात जाहीर सभा

सोलापूर/प्रतिनिधीः भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा सोमवार, २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता सोलापुरातील होम मैदानावर होणार आहे. भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारार्थ ही जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे.

भाजप आणि महायुतीकडून लोकसभा निवडणुकीत प्रचाराचा धडाका लावण्यात आला आहे. सोलापूर शहर मध्यसह सोलापूर शहर उत्तर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, पंढरपूर - मंगळवेढा तसेच मोहोळ या विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पार्टी आणि महायुतीतर्फे कॉर्नर बैठका, गाव भेटी, लाभार्थ्यांशी संवाद मतदारांच्या भेटी सुरू आहेत. यावेळी भाजपा आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. सोलापूरसह देशाचा सर्वांगीण विकास करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच पाठीशी उभे राहण्याचा निर्धार मतदार वर्गातून व्यक्त होत आहे.

याच प्रचाराचा भाग म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेचे आयोजन सोमवार, २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता सोलापुरातील होम मैदान येथे करण्यात आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सोलापूर शहर जिल्ह्यासह देशाच्या विकासाचे व्हीजन ऐकण्यासाठी



सोलापूरकरांनी प्रचंड संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीकडून करण्यात आले आहे.

## वाचनाने माणूस सुसंस्कृत, प्रगल्भ होतो

### जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के

#### जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाच्या वतीने जागतिक पुस्तक दिन साजरा

सोलापूर/प्रतिनिधीः ग्रंथ व पुस्तके हे माणसे घडविण्याचे काम करतात. सर्वानी ग्रंथ अथवा पुस्तके सातत्याने वाचली पाहिजेत. वाचनाने माणसे सुसंस्कृत, प्रगल्भ होत असतात. असे जिल्हा माहिती सुनिल सोनटक्के यांनी सांगितले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयात आज जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात होते. ग्रंथ प्रदर्शनाचे उद्धाटन जिल्हा माहिती अधिकारी श्री सोनटक्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाचे प्रमोद पाटील, प्रदीप गाडे तसेच असंख्य वाचक वर्ग उपस्थित होते.यावेळी जिल्हा माहिती अधिकारी सोनटक्के म्हणाले, । पान २ वर



## इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्ह्यातील अनुसुचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळेत सन २०२४-२५ मध्ये इयत्ता पहिलीमध्ये मोफत प्रवेशासाठी जास्तीत-जास्त इच्छूक पालकानी १५ मे २०२४ पर्यंत परिपुर्ण अर्ज सादर करावेत असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकासचे प्रकल्प अधिकारी बळवंत गायकवाड यांनी केले आहे.

या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. इयत्ता पहिली करीता विद्यार्थ्याचे वय दि. ३१ डिसेंबर, २०२४ पर्यत ६ वर्षे पुर्ण असावे.विद्यार्थ्यांच्या पालकाचे कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयापर्यंत असावे.

. अनुसुचित जमातीच्या जातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत, रेशनकार्ड, रहिवाशी दाखला, उत्पन्न दाखला आदी प्रती सादर कराव्यात. विद्यार्थ्याच्या अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, जन्मतारखेसाठी ग्रामसेवकाचा दाखला अथवा अंगणवाडीचा दाखला जोडण्यात यावा. विद्यार्थ्याच्या व पालकाच्या आधारकार्डची छायांकित प्रत जोडावी. विद्यार्थ्यांचे पालक शासकीय अथवा निमशासकीय सेवेत नसावेत. विद्यार्थ्यांचे पालकांनी खोटी माहिती सादर केल्यास पाल्यांचा प्रवेश रद्द केला जाईल. सदर योजनेंतर्गत निवड झालेल्या विद्यार्थ्याला एकदा शाळा निश्र्चीती झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये पालकांच्या अथवा पाल्यांच्या विनंतीनुसार शाळा बदलता येणार नाही.अधिक माहितीसाठी. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, सोलापूर दक्षिण सोलापूर तहसिल कार्यालयाच्या वरील मजल्यावर, सिध्देश्र्वर पेठ, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार सोलापूर तसेच प्र. सहा प्रकल्प अधिकारी पी. व्ही. परचाके ( मो. नं. ७३५०३२०२७६ ) यांचेशी संपर्क साधावा असे आवाहनही एकात्मिक आदिवासी विकासचे प्रकल्प अधिकारी श्री गायकवाड यांनी केले

## महायुतीचे उमेदवार व राम सातपुते यांच्यासह अनेक मान्यवरांची ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रेस उपस्थिती



अक्कलकोट/प्रतिनिधीः श्रीक्षेत्र अक्कलकोट नगरीचे ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रेच्या ५ व्या दिवशी निघणाऱ्या नंदी ध्वजाच्या मिरवणुकीत आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपा महायुतीचे उमेदवार व आमदार राम सातपुते, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्यासह आदिजन उपस्थित होते.

निघालेल्या नंदी ध्वजाच्या मिरवणुकीत पाटील, रोडगे, अडवितोटे, लिंबीतोटे, नंदिकोले आदी या ५ नंदीध्वज मानकर्यांसह शेकडो श्री मल्लिकार्जुन भक्त उपस्थित होते. मंगलमय वातावरणात श्री नवसाचा मारुती मंदिर, राजे फत्तेसिंह चौक, सर्जेराव जाधव पथ, समर्थ चौक, सोन्या मारुती चौक, विर सावरकर चौक, मेन रोड, कारंजा चौक मार्गे निघालेल्या मिरवणुकीत श्री मल्लीकार्जुन महाराज की जय...! जय घोषात व सहवाद्याने सारा आसमंत दुमदुमुन गेला होता. श्री मल्लिकार्जुन । पान २ वर

## संपादकीय

### तापमान वाढ...

सध्या शब्दश: शरीर भाजून काढणाऱ्या उन्हाळ्याचा अनुभव आपण सर्वजण घेत आहोत. महाराष्ट्रात कधी काळी विदर्भातील जिल्ह्यांतून ४० अंशांच्या पलीकडे तापमान गेल्यानंतर तिथले लोक कसे राहात असतील, असा प्रश्न इतर ठिकाणच्यांना सतावायचा! गेल्या तीन-चार वर्षांपासून विदर्भाचा अनुभव उर्वरित महाराष्ट्र घेत आहे. एप्रिल महिना सुरू असताना तापमान ठिकठिकाणी ४३ अंशांपर्यंत जाऊन पोहोचले आहे. उन्हाचे तीव्र चटके बसणे म्हणजे नेमके काय याचा 'याचि देहि' अनुभव सर्वांना येत आहे. तापमान वाढ होणे नवे नाही. अनेकदा तापमान वाढ झाली आहे किंबहुना त्याचे पुरावे अंटार्क्टिकामधील बर्फाच्या अस्तरात मिळतात, मात्र अलीकडच्या काही वर्षांत तापमानाचे बिघडलेले संतुलन किंवा तापमानात होणारी वाढ जगाच्या चिंतेचा विषय झाला आहे. शास्त्रज्ञांकडून जागतिक तापमान वाढ अर्थात ग्लोबल वॉर्मिंगबाबत वारंवार इशारे देण्यात येत असतानाही त्याला महत्त्व दिले गेले नाही. तथाकथित विकासाच्या नावाखाली निसर्गाला ओरबाडण्याचे काम अव्याहत चालू आहे. जंगलतोड झाल्याने निसर्गाचे संतुलन बिघडले आहे. सप्ताहाचे १६८ तास राजकारणात आकंठ बुडालेले सर्वच पक्षांतील नेते पर्यावरण हा विषय गांभीर्याने घेण्यास तयार नाहीत. सध्याच्या तापमान वाढीला मानव जबाबदार आहे. हिमप्रदेशातील बर्फ वितळण्यास सुरुवात झाली तरी आपले डोळे उघडत नाहीत. काही दिवसांपूर्वी समुद्र किनारी असलेल्या महानगरांना बर्फ वितळण्यामुळे कसा धोका पोहोचू शकतो याकडे तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे. कडक उन्हाळ्याने सर्वांच्या तोंडचे पाणी पळविलेले असताना ग्रामीण भागातून जंगलामध्ये लागणारे वणवे चिंता वाढवत आहेत. बाजूला भट्टी पेटविलेली असावी असे अनेक गावांचे वातावरण आहे. सर्वत्र 'उष्णताकल्लोळ' सुरू असताना मोठ्या महामार्गांसाठी वृक्षांची निर्दयीपणे तोड केल्याचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. काही ठिकाणी रस्त्याचे काम झाले तरी आजूबाजूला झाडांचा पत्ता नाही. वड, पिंपळ, आंबा, चिंच आणि इतर महाकाय वृक्षांची सहजपणे छाटणी झाल्याने रस्त्यावरील सावली हरवली आहे. या रस्त्यावर वाहन नादुरुस्त झाले, तर चालकासह प्रवाशांना रणरणत्या उन्हात थांबावे लागते. यापूर्वी वाहने डेरेदार वृक्षाखाली थांबवून भोजन, विश्रांतीचा आनंद घेतला जात असे. ते सुख आता हरवले आहे. मोठी झाडे तोडून शोभेची झाडे रस्त्याच्या मध्यभागी लावण्याचा सपाटा लावण्यात आला आहे. शासन वृक्षारोपणासाठी आग्रही असते, मात्र त्यात चमकोगिरीचा भाग अधिक असतो. विकासाच्या नावाखाली झाडे तोडणे म्हणजे आपण आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे

पान १ वरुन

### १३ राज्यांत लोकसभेच्या

ॲना राजा व भाजपचे प्रदेशाध्यक्ष के. सुरेंद्रन यांच्यामुळे इथे तिहेरी लढत होईल. थिरुवनंतपूरममध्ये काँग्रेसचे शशी थरूर विरुद्ध केंद्रीयमंत्री राजीव चंद्रशेखर ही लढत तुल्यबळ होण्याची शक्यता आहे.

राजस्थानमध्ये टोंक-सवाई माधवपूर, अजमेर, जोधपूर, बारमेर, जालोर, उदयपूर, चित्तोडगढ, राजसमंद अशा काही मतदारसंघांमध्येही ध्रुवीकरणाचा मुद्दा महत्त्वाचा ठरू शकतो. जोधपूरमधून केंद्रीयमंत्री गजेंद्रसिंह शेखावत, कोटामधून विद्यामान लोकसाध्यक्ष ओम बिर्ला यांना पुन्हा संधी मिळालेली आहे.

उत्तर प्रदेशमध्ये मथुरा, मेरठ, गाझियाबाद, अलिगढ, अमरोहा, बागपत, गौतमबुद्ध नगर, बुलंदशहर या मतदारसंघांमध्ये शुक्रवारी २६ एप्रिल रोजी मतदान होणार असून इथे ध्रवीकरणाचा भाजपला लाभ मिळू शकतो. मुथरेमधून भाजपने पुन्हा हेमामालिनी यांना उमेदवारी दिली आहे. मेरठमधून रामाचे पात्र रंगवणारे अरुण गोविल रिंगणात उतरले आहेत. गौतमबुद्धनगर (नोएडा) भाजपचे महेश शर्मा यांच्यामुळे लक्षवेधी ठरली आहे.

१३ राज्यांत ८९ जागा

* केरळ (२०), कर्नाटक (१४), राजस्थान (१३), महाराष्ट्र व उत्तर प्रदेश (प्रत्येकी ८), मध्य प्रदेश (७), आसाम व बिहार (प्रत्येकी ५), छत्तीसगड व पश्रि्चम बंगाल (प्रत्येकी ३), आणि जम्मू-काश्मीर, मणिपूर व त्रिपुरा (प्रत्येकी १).

* पहिल्या फेरीमध्ये तामीळनाडूमधील ( जागा) मतदान पूर्ण झाले असून दुसऱ्या फेरीत केरळ (२०) व राजस्थान (२६) या दोन राज्यांमधील मतदान पूर्ण झालेले असेल.

### वाचनाने माणूस सुसंस्कृत,

वाचन माणसाला समृद्ध करतेच शिवाय काय चांगले काय वाईट याची समजही वाचनातून प्राप्त होत असते. संवेदनशीलता आणि आत्मविश्र्वास देखील वाचनातून प्राप्त होतो. कोणत्याही व्यक्तीला यश प्राप्तीसाठी पुस्तकांचा फार मोठा फायदा होतो. ग्रंथ प्रदर्शनामुळे वाचकांना नवीन ग्रंथ, पुस्तके पहावयास मिळतात. त्यातुनच वाचनाची आवड निर्माण होते. त्याचबरोबर वाचक वर्ग वाढवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## डुबेरेच्या जनता विद्यालयाचे प्राचार्य दिगंबर पठारे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त..

डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य दिगंबर दादा पठारे हे मविप्र समाज संस्थेतील जवळपास ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून दिनांक ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. दिनांक २५एप्रिल २०२४ रोजी संस्थेचे सरचिटणीस नितीनजी ठाकरे यांचे हस्ते त्यांना निरोप देण्यात येणार आहे. त्यानिमित्ताने........



पठारे यांचा जन्म १ जून १९६६ रोजी सातारे ता. येवला येथे एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सातारे आणि पुरणगाव येथे तर माध्यमिक शिक्षण जनता विद्यालय जळगाव नेऊर येथे पूर्ण केले. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण लासलगाव येथे झाले. त्यांनी सन १९९० साली मालेगाव येथे बी. एड. पूर्ण केले. व्यावसायिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रत्येक व्यक्तीचे ध्येय असते की एखाद्या नामांकित संस्थेत शिक्षकाची नोकरी मिळावी. त्यांची ती इच्छा पूर्ण झाली आणि महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेली मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक या संस्थेत शिक्षक म्हणून नोकरीची संधी मिळाली.या मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले.त्यांच्या नोकरीची सुरुवात सन १९९२ साली जनता विद्यालय, देशमाने ता. येवला येथून झाली. येथील सेवेत अगदी कमी कालावधीत त्यांनी इंग्रजी विषयाचा एक चांगला शिक्षक म्हणून नावलौकिक मिळविला. त्याचा स्वभाव अत्यंत मितभाषी, शांत, परिश्रमी, कर्तव्यनिष्ठ, मनमिळावू, परोपकारी व्यक्तिमत्व असलेला.त्यांनी धार्मिक क्षेत्रातही आपला ठसा उमटविलेला आहे. त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी निष्ठेने पूर्ण करण्यात ते नेहमीच अग्रेसर असायचे. लेट हा शब्द त्यांच्या डिक्शनरीमध्ये कधीच नव्हता. त्यांची अध्यापनावरील एकनिष्ठता व प्रमाणिकपणा याचे फळ त्यांना मिळाले. प्रामाणिक कामामुळे त्यांना बराच काळ येवला तालुक्यातच सेवा करण्याची संधी मिळाली.

अध्यापनाचे काम करत असतानाच कला, कार्यानुभव,स्काऊट गाईड , सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रमातील त्याचा सहभाग उल्लेखनीय असायचा. विद्यार्थ्यांची सर्वांगीण प्रगती होण्यासाठी त्यांनी आपले मोलाचे योगदान दिले .आजही त्याचे आजी माजी विद्यार्थी त्यांचा आदर करतात व मार्गदर्शन घेतात.

त या ं नी उपशिक्षक,पर्यवेक्षक,उपमुख्याध्यापक,मुख्याध्यापक म्हणून यशस्वी सेवाकार्य केले.मुख्याध्यापक म्हणून त्यांना फक्त तीन महिन्यांचा कालावधी मिळाला. परंतु कमी अवधीतही शाळेसाठी त्याचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.आपल्या सेवाकाळात त्यांनी शाळेची सर्वांगीण प्रगती,पालकांशी सुसंवाद , विद्यार्थ्यांच्या समस्या , शाळेय शिस्त इत्यादी सर्व बाबी मध्ये लक्ष घातले.अतिशय मनमिळाऊ स्वभाव, अचूक काम करून घेण्याची क्षमता, योग्य माणूस - योग्य काम, संस्थेच्या शिस्त, गुणवत्ता व पारदर्शकता या त्रिसूत्रीचा वापर करून त्यांनी शाळेला प्रगतीपथावर नेले . विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी त्यांनी जातीने लक्ष घातले. त्यांनी इंग्रजी विषयाचे उत्कृष्ट अध्यापन केले. त्यांचे इंग्रजी विषयावर प्रभुत्व होते.विषयज्ञान व अध्यापन कौशल्य यांच्या जोरावर इंग्रजी विषयाच्या इयत्ता १० वीच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली. त्यामुळेच ते विद्यार्थीप्रिय शिक्षक झाले. सेवा करीत असताना त्यांनी एस.एस.सी. बोर्डाचे परीक्षक , उपकेंद्र संचालक, केंद्रसंचालक, सहाय्यक परिरक्षक इत्यादी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या .

आपल्या प्रदिर्घ सेवेत त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून अनेक शैक्षणिक उपक्रम राबवले. त्यामुळे त्यांचा पालक संपर्क ही अतिशय मोठ्या प्रमाणात आहे.त्यांना शाळेत संपन्न झालेल्या उपक्रमाचे तसेच इतर विषयांवर व्हिडिओ ,पी.पी.टी.तयार करणे या विषयी आवड आहे.त्यानी कोरोणा काळात शालेय अभ्यासक्रमावर आधारित अनेक व्हिडीओ बनवले. त्यांच्या स्वतः च्या नावाने यू ट्युब चॅनल आहे.तसेच त्यांना गि-यारोहणाची, व्यायामाची आणि फिरण्याची आवड आहे.

असं हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व लाभलेल्या श्री.पठारे सरांनी शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात वावरतांना मोठ्या प्रमाणात मित्रपरिवार गोळा केला आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे त्यांच्या अर्धांगीनीचे अर्थात पत्नीचे योगदान असते.त्याच्या सहचारिणी सौ. सुशीला याही त्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभ्या राहिलेल्या आहेत. आई वडीलांच्या पश्र्चात त्यांच्या बंधुंनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे त्यांना हा शैक्षणिक प्रवास करणे शक्य व सुलभ झाले.त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. दोघेही विवाहित आहेत. मुलगा बी.एस्सी. ॲग्री असून स्वतःचा व्यावसाय आहे.मुलगी फॉर्मसी आहे. त्याचे अनेक विद्यार्थी उच्च पदापर्यंत पोहोचलेले आहेत. सरांचे शैक्षणिक , सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील योगदान अतिशय महत्वाचे आहे. सतत आनंदी , हसतमुख व मितभाषी असलेल्या श्री.पठारे सरांना सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य अगदी सुखासमाधानाचे ,आरोग्यदायी, भरभराटीचे जाओ. दीर्घायुष्य लाभो .हीच ईश्र्वरचरणी प्रार्थना.त्यांचे शैक्षणिक कार्य सदैव स्मरणात राहील.

**शब्दांकन-सोमनाथ गिरी (सर )जनता विद्यालय डुबेरे**

### महायुतीचे उमेदवार व राम..

मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शिवलिंग स्वामी, शिवकुमार कापसे, प्रशांत लोकापुरे, महेश हिंडोळे, बसलिंगप्पा खेडगी, बसवराज माशाळे, शिवशरण जोजन, अविनाश मडीखांबे, राजशेखर नागुरे, स्वामीनाथ हिप्परगी, विजयकुमार लिंबीतोटे, राजशेखर हिप्परगी, राजशेखर उंबराणीकर, स्वामीनाथ नागुरे, निलकंठ कापसे, सुनिल गोरे, प्रमोद गोरे, मानकरी सुनिल नंदीकोले, डॉ.बसवराज नंदीकोले, मल्लिनाथ नंदीकोले, सुरेश नंदीकोले, सचिन नंदीकोले, संजय नंदीकोले, प्रकाश नंदीकोले, मानकरी दयानंद रोडगे, नागराज रोडगे, सुनिल दसले, दयानंद बिडवे, सिध्दाराम रोडगे, महांतेश रोडगे, शरणप्पा रोडगे, दिपक रोडगे, प्रशांत शिंपी, दत्ता कटारे, श्रीशैल जडगे, मानकरी शरणप्पा लिंबीतोटे, विजयकुमार लिंबीतोटे, शशिकांत लिंबीतोटे, सुनिल लिंबीतोटे, राजकुमार लिंबीतोटे, लक्ष्मीकांत लिंबीतोटे, अक्षय, संकेत, राहुल, लिंबीतोटे, मानकरी स्वामीनाथ आडवितोटे, महादेव आडवितोटे, शिवशंकर आडवितोटे, संजय आडवितोटे, शरणु तडवळ, योगेश सुतार, सचिन छकडे, संजय माळी, महादेव चंद्रकांत आडवितोटे, मल्लिनाथ आडवितोटे, मानकरी अप्पासाहेब पाटील, शरणकुमार पाटील, निखिल पाटील, गुरुशांत पाटील, इरेश पाटील, मल्लिनाथ पाटील, आकाश पाटील, शरणु पाटील, भारत पाटील, राजकुमार पाटील, सचिन कलबुर्गी, अनिल कलबुर्गी, प्रा.शरणप्पा अचलेर, स्वामीराव मोरे, आकशा शिंदे, प्रकाश मांढरे, सुनील लिंबीतोटे, प्रशांत मांढरे, संतोष फडणीस, अक्षय लिंबीतोटे, रवी बिराजदार, महेश लिंबीतोटे व यांच्यासह मनोज निकम, राजाभाऊ नवले, अभियंता अशोक येणगुरे, नन्नु कोरबू, निखील पाटील, अप्पासाहेब पाटील, सौरभ मोरे, प्रवीण घाडगे, गोटू माने, महांतेश स्वामी, राहुल इंडे, प्रसन्न हत्ते यांच्यासह शेकडो भक्तगण उपस्थित होते.

### तीन लोकसभा जागांवर उभे ...

मुभा आहे. परंतु व्यंकटेश्र्वरा महास्वामीजी हे तीन मतदारसंघांतून उभे आहेत. शिवाय कर्नाटकात विजयपूर राखीव मतदारसंघातही त्यांची उमेदवारी रिंगणात असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. त्याची पडणाळणी केली जात आहे. जर ती खरी असेल तर एकाचवेळी चार मतदारसंघांतून व्यंकटेश्र्वरा महास्वामी यांची उमेदवारी असल्याचे स्पष्ट होईल. व्यंकटेश्र्वरा महास्वामीजी हे शेजारच्या कर्नाटकातील विजयपूर जिल्ह्यातील चडचण येथील मूळ राहणारे आहेत. मागील २०१९ सालच्या सोलापूर लोकसभा निवडणुकीतही त्यांची अपक्ष उमेदवारी होती. त्यांना अत्यल्प मते मिळून त्यांची अनामत रक्कम जप्त झाली होती.

## निवडणूक यंत्रणेची आचारसंहिता भंग करणाऱ्यांवर नजर

### जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांची माहिती

मुंबई : लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा १६ मार्च २०२४ रोजी करण्यात आली. त्यानंतर तात्काळ आचारसंहिता लागू झाली. आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघात साडेपाचशेहून अधिक पथके अहोरात्र २४x७ असे काम करीत आहेत. लोकसभेच्या चारही मतदारसंघात निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडावी, यासाठी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनीही सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी केले.

जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. क्षीरसागर यांनी सोमवारी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक घेतली. त्यावेळी त्यांना जिल्हा निवडणूक यंत्रणेने केलेल्या तयारीची माहिती दिली. बैठकीस अपर जिल्हाधिकारी मनोज गोहाड, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) तेजस समेळ यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. क्षीरसागर यांनी सांगितले की, २६ एप्रिलपासून निवडणूकीसाठी अर्ज भरण्यास सुरुवात होणार आहे. रविवार, दुसरा आणि चौथा शनिवार आणि एक मे या सुटीच्या दिवशी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज भरण्याची मुदत ३ मेपर्यंत असून ४ मे रोजी अर्जाची छाननी होईल. दिनांक ६ मेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २० मे रोजी मतदान आणि ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे. अर्ज भरु इच्छिणाऱ्या उमेदवारांनी अर्जासोबत भरावयाची माहिती, त्यासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे याची माहिती करुन घ्यावी. याबाबत काहीही शंका असल्यास संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असेही श्री. क्षीरसागर यांनी स्पष्ट केले.

पाचपेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या ठिकाणी एकाचवेळी गर्दी होणार नाही, यासाठी मतदान केंद्रस्तरीय आराखडा तयार करण्यात आला आहे. कमीत कमी वेळात मतदार मतदान करुन मतदान केंद्राच्या बाहेर पडेल, असे नियोजन करण्यात येत आहे. त्यासाठी तेथील विविध मतदार केंद्रांना कलर कोड देण्याची संकल्पना राबविण्यात येणार आहे. याशिवाय, त्यासाठी मतदारांना सहाय्य करण्यासाठी मतदारदूत यांची नेमणूक केली जाणार आहे.

आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणारनिवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध पथके नियुक्त करण्यात आले आहेत. यामध्ये व्हीडिओ सनियंत्रण पथक, स्थिर सनियंत्रण पथक, व्हीडिओ व्हिविंग पथक, भरारी पथकांचा समावेश आहे. जिल्ह्यातील चारही लोकसभा मतदारसंघातील २६ विधानसभा मतदारसंघात या आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी साडेपाचशेहून अधिक पथकांची नियुक्ती करण्यात आली असून ही पथके २४x७ आचारसंहिता भंग होणार नाही यासाठी दक्ष आहेत. कोणत्याही परिस्थितीत निवडणुका निष्पक्ष आणि शांततेच्या वातावरणात होतील यादृष्टीने जिल्हा निवडणूक यंत्रणेने पावले उचलली असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. क्षीरसागर यांनी सांगितले.

मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न

जिल्ह्यात राष्ट्रीय आणि राज्य सरासरी इतके मतदान व्हावे यासाठी स्वीप उपक्रमाच्या माध्यमातून मतदार जनजागृती उपक्रम राबविण्यात आले. याशिवाय, मतदानाच्या दिवशी मतदारांना कमीत कमी वेळेत मतदान करुन परत जाता यावे, यासाठीचे नियोजन करण्यात आले आहे. मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, जेथे शक्य असेल तेथे बैठक सुविधा, मतदान केंद्रांवर दिशादर्शक असणार आहेत.

येत्या दोन दिवसात निवडणूक निरीक्षक जिल्ह्यात येणार मुंबई उपनगर जिल्ह्यातील चारही मतदारसंघासाठी ६ खर्च निरीक्षक, ४ जनरल निरीक्षक आणि कायदा व सुव्यवस्था यासाठीचे २ निरीक्षक भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केले आहेत. येत्या २-३ दिवसात खर्च निरीक्षक जिल्ह्यात दाखल होऊन निवडणूक प्रक्रिया आणि खर्चाचा आढावा घेतील.

## लोकसभा निवडणूक झाल्यानंतर एकनाथ शिंदे संपलेले असतील, नाना पटोलेंचा हल्लाबोल

मुंबई : 'मला 'भाजपचा एजंट' संबोधणाऱ्या प्रकाश आंबेडकरांच्या कोणत्याही सर्टिफिकेटची मला गरज नाही. कोण कोणाचे एजंट आहे, हे जनतेला चांगलेच माहिती आहे'', असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय. ते अकोला जिल्ह्यातील पिंजरमध्ये बोलत होते. यावेळी नाना पटोले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही सडकून टीका केली आहे.

नाना पटोले म्हणाले, मला 'भाजपचा एजंट' संबोधणाऱ्या प्रकाश आंबेडकरांच्या कोणत्याच सर्टीफिकेटची मला गरज नाही. कोण कुणाचे एजंट आहे हे जनतेला माहिती आहे. मविआमध्ये आपला अपमान झाला असं सांगणाऱ्या एकनाथ शिंदेंचा खरा अपमान भाजपने सुरु केला आहे. लोकसभेच्या निकालानंतर एकनाथ शिंदे संपलेले असतील, अशी टीकाही नाना पटोलेंनी केलीये.

नाना पटोलेंनी यावेळी बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदींचा 'बनिया' असा एकेरी उल्लेख केलाय. देशात कोरोना मोदींनीच आणला. आपल्याकडे दोन पर्याय आहेत. आपल्या लोकशाही वाचवणे आणि संविधान वाचवायचे आहे. इंडिया आघाडीच्या सरकारला केंद्रात बसवणे, महत्वाचे आहे. आमच्या पैसा अदाणी अंबानीकडे जात आहे तोच पैसा भाजपच्या घरात जात आहे. आता जनतेने ठरवायचे बरबाद वायचे की करायचे ? असंही पटोले यांनी स्पष्ट केले.

अकोल्यात काँग्रेस पक्षाने अभय पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यापूर्वी वंचितशी आघाडीच्या चर्चा सुरु होत्या. तेव्हा महाविकास आघाडीकडून प्रकाश आंबेडकरांना चर्चा सुरु होत्या. मात्र, प्रकाश आंबेडकरांनी मनोज जरांगेंसोबत तिसरी आघाडी करताच काँग्रेस पक्षाने अभय पाटील यांना अकोल्यातून उमेदवारी जाहीर केली.

अकोला लोकसभा मतदारसंघात तिरंगी लढत पाहायला मिळत आहे. कारण भाजपने अनुप धोत्रे यांना उमेदवारी दिली आहे. तर महाविकास आघाडीकडून अभय पाटील मैदानात उतरवण्यात आलं आहे. अभय पाटील हे मोठे सर्जन आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# टाकेद बु.आश्रमशाळा संस्थाचालकाची मुख्याध्यापकास बेबंदशाह

## मुख्याध्यापक संघांचा तिव्र आंदोलनाचा इशारा



निफाड/प्रतिनिधी : टाकेद बु . येथील संस्थेने सदर मुख्याध्यापक यांना क्षुल्लक कारणे देऊन, कोणतेही गंभीर आरोप नसतांना, संस्थेच्या आपापसांतील मतभेद आणि वाद असल्याने, संशयावरून कारवाई करण्यात आली. प्रत्यक्षात संस्थेच्या अंतर्गत वादाचे निमित्त आणि त्याबाबत प्राथमिक मुख्याध्यापक व शिक्षक यांनी मिळून संस्थेच्या सेक्रेटरीना चुकीची माहिती पुरवून कारवाई करण्यास ,कारणे वेगळी आहेत परंतु संस्थेने कोणत्याही बाबींची खातरजमा न करता केवळ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे* मुख्याध्यापक आर डी पठाडे यांच्यावर गंभीर कारवाई करत त्यांना पदावनत केलेले आहे....

संस्था मागील दोन वर्षापासून वारंवार सदर मुख्याध्यापक यांच्यावर अन्याय व अत्याचार करत होती वेळोवेळी संस्थेने शिक्षक ,कर्मचारी यांना हाताशी धरून खोटे आरोप करून मेमो दिलेले होते . सदर मेमोंची समर्पक खुलासे* करूनही संस्थेने वेळोवेळी शिक्षक कर्मचारी यांना हाताशी धरून मुख्याध्यापक यांच्यावर खोटेनाटे आरोप करून मेमो दिलेले आहेत .....सदर मुख्याध्यापक यांनी वेळोवेळी खुलासा केलेला असूनही संस्थेने चौकशी समिती स्थापन करून शुल्लक आरोप दोषारोप ठेवून* त्यांना मुख्याध्यापक पदावरून पदावनत करत खालच्या पदावर आणले. ....तसेच सेवाजेष्ठतेने कनिष्ठ असलेल्या शिक्षकाला आपला मर्जीतील माणूस म्हणून जंपिंग प्रमोशन देऊन मुख्याध्यापक पदावर पदोन्नती दिलेली आहे .तीही चुकीची आहे. सदर सर्व बाब ही या मुख्याध्या - पकावर अन्यायकारक आहे आणि म्हणून सर्व बाबींचा* नियमांचा विचार करता अशा प्रकारे बारा वर्षे कार्यरत असलेल्या मुख्याध्यापकाला आपल्या* पदावरून पदावनत करून खालच्या पदावर आणून त्याचे आर्थिक नुकसान करणे, मानसिक खच्चीकरण करणे आणि त्याचे आयुष्य उध्वस्त करण्याचा प्रकार आहे, आज सर्वत्रच खाजगी संस्था चालविणारे संस्थाचालक मनमानी करून कुणालाही* पदोन्नती देतात किंवा पदावनत* करत* खालच्या पदावर आणले जाते नोकरीतून बडतर्फ केले जाते, खोटे आरोप ठेवून चौकशी समिती नेमुन त्याला दोषी ठरवून सेवेतून काढून टाकणे असे सर्रास प्रकार काही आश्रम शाळांमध्ये दिसत आहे, यावर शासनाचाही अंकुश नाही आणि आदिवासी* विकास विभागाचाही अंकुश दिसून येत नाही,असे आरोप मुख्याध्यापक संघाचे सचिव एस बी देशमुख यांनी केले आहेत. आश्रमशाळा मुख्याध्यापक, विभागातील मुख्याध्यापक, सहकारी याच्यावर संस्थेमार्फत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून बनावट व खोटे आरोप लिहून घेऊन बेकायदेशीर कारवाई संस्थेने केलेली आहे, अशा सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या खोट्यानाट्या आरोपांवर चौकशी समिती नेमण्यात येऊन त्या मुख्याध्यापकाची चौकशी करण्यात आली. सदर समितीचा* निर्णय सकारात्मक असून ,संस्थेने बेकायदेशीर मार्गाने ज्युनियर व्यक्तीला मुख्याध्यापक पद देण्याकरिता आणि हट्ट पूर्ण करण्याकरिता चौकशी समितीच्या निर्णयालाही न जुमानता आपल्या* सहकाऱ्याला पदावनत करून त्याला शिक्षक पदावर आणून कनिष्ठ शिक्षकाला मुख्याध्यापक करत आहे ही शोकांतिका आहे. आज आपण वेळीच जागृत होऊन एक नाही झालो तर अशी वेळ भविष्यात आपल्या पैकी कोणावरही येऊ शकते,* मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी उद्या साडेअकरा वाजता मा.अप्पर आयुक्त संदीप गोलाईत यांची याअन्याया संदर्भात महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे व नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाचे पदाधिकारी आश्रमाच्या मुख्याध्यापकाकरिता अप्पर आयुक्तांची भेट घेतली, आज एक मुख्याध्यापक मित्र जात्यात असेल तर इतर अनेक सुपात आहेत अशी भीतीदायक* भावना अनुदानित आश्रमशाळांच्या* मुख्याध्यापकांमध्ये निर्माण झालेली आहे. याप्रमाणे जर ही कारवाई संस्थेकडून यशस्वी करण्यात आली आणि त्या मुख्याध्यापकाला पदावनत करून शिक्षक करण्यात आले तर आश्रम शाळा विभागांमध्ये चुकीचा पायंडा पडू शकेल चुकीची रीत निर्माण होईल* याकरता आपण सर्वांनी एकत्र येऊन सहकार्य करावे हि विनंती. संस्थाचालकांकडून असे गैरप्रकार होत असल्याने असे चित्र सर्वत्र बघायला मिळत आहे. त्यामुळे प्रामाणिक व सत्य काम करणारे कर्मचारी यात होरपळून त्यांचं आयुष्य उध्वस्त होत आहे असे मुख्याध्यापक संघाच्या लक्षात* आलेले आहे या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार व्हावा व या असल्या प्रकारांना शासनाने आदिवासी विकास विभागाने वेळीच थांबवावे अशा प्रकारच्या संस्था चालकांवर व यांच्या मनमानी कारभारावर चाप बसला पाहिजे त्याकरिता आदिवासी विकास विभाग येथील अधिकाऱ्यांनी सर्व बाबींची योग्य शहानिशा करून तपासणी करून नंतरच निर्णय घ्यावा व* संस्थाचालकांच्या या बेबंदशाहीला, हुकूमशाहीला वेळीच आळा घालावा असे मुख्याध्यापक संघातर्फे आवाहन करण्यात आलेले आहे . या मुख्याध्यापकावरील अन्याय जर दूर झाला नाही तर मुख्याध्यापक संघातर्फे तीव्र आंदोलन छेडले जाईल असे नाशिक जिल्हा* मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष एस के सावंत , सचिव - एस .बी .देशमुख, उपाध्यक्ष प्रदिप सांगळे , आश्रमशाळा विभागाचे नेते विजय पाटील, डॉ . अनिल माळी , अनिल खालकर, डी .जे . रणधीर,भागीनाथ घोटेकर, मंगला सोनवणे , निर्मला पगार, मुक्ता पाटील यांनी सांगितले*



## निफाड येथे ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने भगवान महावीरांना अभिवादन

निफाड/प्रतिनिधी:अहिंसेचा संदेश देणाऱ्या भगवान महावीरांची निफाड शहरातून मोठ्या उत्साहात भव्य मिरवणुक काढण्यात आली होती.चैत्र शुद्ध त्रयोदशी दिनी पवित्र आणि नवचैतन्याच्या दिवशी जैन धर्माचे २४ वे तीर्थकर जगाला सत्य आणि अहिंसेचा मार्ग दाखविणारे भगवान महावीर यांचे भूतलावर अवतरण झाले यांच्या जयंती निमित्ताने संघपती नंदलाल चोरडिया यांचे मार्गदर्शनाखाली दिव्य भव्य अशा प्रसन्न भक्तिमय वातावरणात सकल जैन समाज बांधवांच्या उपस्थितीत निफाड शहरातून मिरवणूक काढण्यात आली होती, यावेळी जैन बंधू भगिनींच्या चेहऱ्यावर सात्विक व धार्मिक असा भाव आनंद ओसंडून वाहत होता, शनी चौकात ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने अध्यक्ष दौलत कापसे उपाध्यक्ष संपत व्यवहारे यांनी भगवान महावीरांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले,व नतमस्तक झाले, याप्रसंगी सघपती नंदलाल चोरडिया ज्येष्ठ नागरिक संघाचे अंबादास कापसे, भास्कर धरराव, एकनाथ चौधरी, सुरेश जाधव ,अंबादास गोळे, बाबुराव खालकर, सुधाकर धारराव ,प्रभाकर वाघ, बाळासाहेब तौवर, माधव कापसे, मधुकर कुंदे ,संपत धारराव ,सुरेश खालकर, शरद ढेपले ,जानकीराम धारराव ,साहेबराव कापसे, रमेश जाधव, किसन कुंदे ,उत्तम गाजरे, सुभाष गाजरे, आदी ग्रामस्थ उपस्थित होते ,शहराच्या मुख्य रस्त्यावरून मिरवणूक जात असताना भाविकांनी महावीरांच्या मूर्तीला पुष्पमाला अर्पण करून नतमस्तक होऊन अभिवादन केले,

## अनोळखी इसमाचे उपचारादरम्यान निधन

निफाड/ प्रतिनिधी :निफाड पोलीस स्टेशन हद्दीतील निफाड पिंपळगाव या रोडवर बागमार इस्टेट जवळ रोडच्या कडेला एक अनोळखी इसम वय अंदाजे ५५ वर्ष असून नाव गाव माहित नाही बेशुद्ध अवस्थेत फिटचे आजाराने पडलेला असल्याचा दिसून आला ,त्यास काही नागरिकांच्या मदतीने उपजिल्हा रुग्णालयात निफाड येथे आणले गेले ,त्याचे वर औषध उपचार चालू असतांना तो दिनांक १९/४/२०२४रोजी रोजी साडेसहा वाजता त्याचे निधन झाले असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले असून ओळख पटविण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय निफाड येथे शवकक्षामध्ये त्याला ठेवण्यात आले होते ,परंतु आज पावेतो त्याचे नातेवाईकांची ओळख पटलेली नाही ,मयत इसमाच्या वारसांचा शोध न लागल्याने त्याचे निफाड नगरपंचायतीच्या सहकार्याने पंचासमक्ष त्याचा अंत्यविधी करण्यात आला असल्याची माहिती पोलीस यांनी दिली असून पुढील तपास निफाड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नंदकुमार कदम यांचे मार्गदर्शनाखाली ए एस आय सारूक्ते, भास्कर पवार, नितीन साळवे हवालदार नितीन सांगळे, , राजू मनोहर, ज्ञानेश्र्वर सानप , हे करीत आहे

## २७ मे पासून स्टार प्रवाहवर सुरु होतेय नवी मालिका येड लागलं प्रेमाचं

मुंबई : स्टार प्रवाह म्हणजे महाराष्ट्राची पहिली पसंती. स्टार प्रवाह वाहिनीने प्रेक्षकांना भावतील आणि दैनंदिन आयुष्याचा भाग वाटतील अश्या मालिकेच्या कथा आणि घरातील सदस्य वाटावीत अशी पात्र उभी करुन रसिकांचं भरभरुन मनोरंजन केलं आहे. मनोरंजनाचा हा प्रवाह असाच अखंडित ठेऊन नव्या मालिकांची पर्वणी स्टार प्रवाह वाहिनी घेऊन येत आहे. घरोघरी मातीच्या चुली आणि साधी माणसं नंतर स्टार प्रवाहवर सुरु होतेय नवी मालिका येड लागलं प्रेमाचं. माणसाला अंतर्बाह्य बदलून टाकतं ते प्रेम. प्रेमात समोरच्याला बदलण्याचा अट्टहास नसतो, जे जसं आहे ते अगदी तसं त्याच्या पूर्ण गुण-दोषांसकट स्वीकारणं म्हणजे प्रेम. येड लागलं प्रेमाचं ही मालिकाही प्रेमातल्या वेडपणाची साक्ष देणारी असेल. महाराष्ट्राचं कुलदैवत अशी ओळख असणाऱ्या विठुरायाच्या पंढरपुर नगरीत या मालिकेची गोष्ट घडणार आहे. राया आणि मंजिरी या मालिकेतली प्रमुख पात्र. एकमेकांचा तिरस्कार करणाऱ्या राया आणि मंजिरीचा प्रेमात पडण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे येड लागलं प्रेमाचं ही मालिका. दख्खनचा राजा ज्योतिबा या मालिकेतून घराघरात पोहोचलेला अभिनेता विशाल निकम आणि स्वाभिमान मालिकेतील प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री पुजा बिरारी या मालिकेत राया आणि मंजिरीची भूमिका साकारताना दिसतील.

स्टार प्रवाहच्या या नव्या मालिकेविषयी सांगताना स्टार प्रवाहचे व्यवसाय प्रमुख सतीश राजवाडे म्हणाले, 'येड लागलं प्रेमाचं ही मालिका प्रेमामुळे बदलत जाणारी माणसं आणि मानसिक स्थिती यावर भर देत हळुवार भावना उलगडत पुढे जाणारी आहे. प्रेक्षकांना मालिकेत भव्यदिव्य सीक्वेन्स बघायला मिळतील आणि करमणूक प्रधान कथा पुढे सरकत जाईल.'राया या पात्राविषयी सांगताना अभिनेता विशाल निकम म्हणाला, 'स्टार प्रवाह माझं कुटुंब आहे. या कुटुंबात पुन्हा एकदा सामील होतोय याचा खूप आनंद आहे. मी आतापर्यंत साकारलेल्या भूमिकांपेक्षा वेगळं आणि हटके असं हे पात्र आहे. खऱ्या आयुष्यातही माझं आणि विठुरायाचं खास नातं आहे. माऊलींच्या आशीर्वादामुळेच इथवरचा प्रवास मी करु शकलो. माझ्या घरी वारकरी संप्रदायाची परंपरा आहे. या मालिकेची गोष्ट देखिल पंढरपुरात घडते. त्यामुळे मी स्वत:ला खूप भाग्यवान समजतो. पुजा बिरारीसोबत मी पहिल्यांदा काम करतो आहे. पुजा खूप समजूतदार आहे. ती स्वत:पेक्षा दुसऱ्याचा जास्त विचार करते. माणूस म्हणून ही सर्वात मोठी गोष्ट आहे असं मला वाटतं. पुजाच्या याच स्वभावामुळे आमचे सीन्स खूप छान होत आहेत अशी भावना विशाल निकम याने व्यक्त केली.'

एका छोट्या ब्रेकनंतर पुजा बिरारी देखिल मंजिरी हे पात्र साकारण्यासाठी फारच उत्सुक आहे. मंजिरी या नावातच गोडवा आहे. हाच गोडवा या पात्रात देखिल आहे. विठुराया तिच्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग आहे. 'शुटिंगच्या निमित्ताने मी पहिल्यांदाच पंढरपुरात गेले. पण पहिल्यांदा गेलेय असं जाणवलं नाही. पंढरपुराने




मला आपलसं केलं आहे असं मला वाटत होतं. पंढरपुरातल्या प्रत्येक गोष्टीत विठुरायाचा वास आहे. शुटिंगच्या निमित्ताने ही गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली. याआधीच्या भूमिकेवर प्रेक्षकांनी भरभरुन प्रेम केलं आहे. हेच प्रेम यापुढेही मिळेल याची मला खात्री आहे अशी भावना पुजा बिरारीने व्यक्त केली.'

विशाल निकम आणि पूजा बिरारीसोबतच मालिकेतून अनेक दिग्गज कलाकार भेटीला येतील. तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका येड लागलं प्रेमाचं २७ मे पासून रात्री १०.३० वाजता आणि अबोली रात्री ११ वाजता फक्त स्टार प्रवाहवर.स्टार प्रवाह संपर्क : सोनाली शिगवण मो.९९३०९२३२४८

## पंढरपूर तालुक्यात महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांचा झंझावती प्रचार दौरा



पंढरपूर/प्रतिनिधीः पंढरपूर तालुक्यातील सुभाष येथे माढा लोकसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारार्थ माजी सभापती सौ वैष्णवी देवी अर्जुन सिंह मोहिते पाटील यांनी गावभर दौरा करत जनसंवाद साधला तसेच तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हासमोरील बटन दाबून धरती भयान विजयी करण्याचे आव्हाने केले

यावेळी शिवसेनेचे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाची जिल्हाध्यक्ष संभाजी शिंदे दीपक दादा पवार तालुकाप्रमुख बंडू घोडके आनंद पाटील राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे संदीप दादा मांडवे माजी उपसभापती प्रतापराव पाटील माजी जिल्हा परिषद सदस्य सुनंदाताई पुणे विठ्ठल कारखाने संचालक गणेश ननवरे कालिदास साळुंखे विजय दादा भोसले महादेव तळेकर सर राजेंद्र भोसले महेश शिंदे सरपंच महावीर गायकवाड उपसरपंच हे मन देवकर विनायक देवकर नंदकुमार देवकर शंकर लांडगे रामचंद्र देवकर आशा देवकर मेघा देवकर तुकसुम काळजी व इतर मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## ५५ वर्षातील सिंचनाचा बॅकलॉग पाच वर्षांत भरून काढला

सांगोला/प्रतिनिधी : सांगोला मतदार संघाच्या विकासाचा तसेच सिंचनाचा बॅकलॉग भरून काढत असताना सर्वसामान्य शेतकरी, जनतेच्या मूलभूत प्रश्र्नांना प्राधान्य दिले आहे. रखडलेल्या विकासाला चालना देण्यासाठी गेल्या पाच वर्षात कोट्यवधींचा निधी उपलब्ध केला आहे. तालुक्याचा पाणीप्रश्र्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून, गेल्या ५५ वर्षांतील सिंचनाचा बॅकलॉग पाच वर्षात भरून काढला असल्याची माहिती आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा पाणीप्रश्र्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. गेल्या पाच वर्षात टेंभू, म्हैसाळ, नीरा उजवा कालवा, स्व. बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना या सिंचन प्रकल्पांना कोट्यवधींचा निधी मंजूर झाला आहे. मतदार संघात रस्ते, पाणीप्रश्र्न, वीज पुरवठा यासह अनेक विकास कामे हाती घेतली आहेत, तर अनेक कामे पूर्ण केली आहेत. इंग्रजांच्या काळात बांधलेल्या शासकीय विश्रामगृह, तहसील कार्यालयाला निधी उपलब्ध करून नूतनीकरणासह सर्व शासकीय कार्यालये एकाच छताखाली आणण्यासाठी प्रशासकीय इमारतीचे काम प्रगतिपथावर आहे.

## रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन मध्ये जागतिक पुस्तक दिनानिमित्त भव्य ग्रंथ दिंडीचे आयोजन

रेणापूर: दि.२३/४/२०२४ रोजी रेणुका एज्युकेशन सोसायटी रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर ता रेणापूर जि. लातूर येथे जागतिक पुस्तक दिनानिमित्त ग्रंथालय विभागाच्या वतीने भव्य ग्रंथ दिंडी काढण्यात आली.

प्रभारी प्राचार्य शशिकांत चीलरगे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.या वेळेस डॉ.हिरकन शेटकर,प्रा रतन लहाने, खट-उ समन्वयक प्रा.उमेश रणदिवे,प्रा रमाकांत गायकवाड, प्रा राधिका माने ,ग्रंथपाल मनीषा लातूरकर , श्री चंद्रकांत आडे,श्री संतोष पवार , शिक्षकेत्तर कर्मचारी व बी एड चे सर्व छात्र अध्यापक ग्रंथ दिंडी मध्ये सहभागी झाले होते.



# मल्लिकार्जुन यात्रा महोत्सवाची सांगता; भव्य-दिव्य रथोत्सवाने संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः श्री श्रीशैल मल्लिकार्जुन की जय च्या जयघोषात ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा महोत्सवाची सांगता मंगळवारी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास भव्य - दिव्य रथोत्सवाने झाली.

ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन यात्रा महोत्सवाला शेकडो वर्षांची परंपरा असल्याने त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. पाच दिवशीय यात्रेच्या मुख्य दिवशी मंगळवारी रथोत्सवात विरशैव लिंगायत समाजांबरोबर इतर सर्व जाती- धर्मातील नागरिक-महिला मोठ्याप्रमाणात सहभागी झाले होते.यामुळे यात्रेमध्ये सर्वधर्म समभावासह भारतीय संस्कृतीचे दर्शन घडले.प्रारंभी पहाटे पाच वाजता देवस्थानात श्री ची महाअभिषेक व महापूजा माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी व अन्य मान्यवरांच्या हस्ते आणि वेदमुर्ती बसवराज शास्त्री यांच्या विविध मंत्रोपचाराने करण्यात आले.त्यानंतर कळसारोहण करण्यात आले.सकाळी १० वाजता शहराच्या प्रमुख मार्गावरुन पालखीची सवाद्य मिरवणुक काढण्यात आले. सकाळपासून देवस्थान भाविकांना दर्शनासाठी व नैवेद्य दाखविण्यासाठी खुला ठेवण्यात आले होते.दिवसभर श्री मल्लिकार्जुन मंगल कार्यालयात शहर व तालुक्यातील हजारो भाविकांना खिरीचे महाप्रसाद वाटप करण्यात आले.

दुपारी ठिक एक वाजता नंदीध्वजाचे मानकरी अमोल पाटील, सेवानिवृत्त प्राध्यापक विजयकुमार लिंबीतोटे, सुनिल नंदिकोले, नागराज रोडगे, स्वामीनाथ आडवितोटे यांच्या घरासमोर पाच ही मानाच्या नंदिध्वज काठ्यांची विधीवत पूजा करुन सवाद्य मिरवणुक मार्गस्थ झाले.नंदिध्वज घेणारे प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी - भक्तगण हे पांढरा शुभ्र बाराबंदी पोशाख परिधान केल्यामुळे



उपस्थित भाविकांचे लक्ष वेधून घेत होते.मिरवणुक मार्गावर सडासंनार्जन करून सप्तरंगी रांगोळी च्या पायघड्या घातले होते. बँन्जो, बँड पथक, ढोल ताशा व सनईचा मधुर आवाज, फटाक्याची आताषबाजी व श्री च्या जयजयकाराने सारे अक्कलकोट शहर व परिसर दुमदुमून गेले होते. विशेष म्हणजे हुबळी येथील कलाकारांनी ठिकठिकाणी मनमोहक नृत्याचा खेळ सादर करुन उपस्थितांची मने जिंकून घेतले.दर्शन व यात्रेचा आनंद लुटण्यासाठी शहर परिसरातून लहान मुलांसह भाविकांनी विशेषतः महिला भाविकांनी गर्दी केली होती. दुपारपासूनच देवस्थान मार्गावरील सर्व रस्ते भाविकांच्या अलोट गर्दीने फुलून गेले होते.नंदिध्वजानां विविध रंगाच्या पताकासह नागफणी ने सुशोभित करण्यात आले होते.

मिरवणुक मार्गावर ठिकठिकाणी महिलांनी नंदिध्वजाचे स्वागत पंचरत्न आरती ओवाळून करीत होते. नंदिध्वजाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी केली होती. हे पाचही नंदिध्वज देवस्थानला पाच प्रदक्षिणा घातल्या नंतर रथोत्सवास प्रारंभ करण्यात आले.

टोलेजंग रथोत्सवाला विविध रंगाच्या फुलांसह पुष्पहारनी सुशोभित करण्यात आले होते. रात्री ठिक आठ वाजता मोठ्या जयजयकाराने सर्व भाविकांनी रथ ओढण्यास सुरुवात केले. या रथावर प्रसाद', खारीक, चुरमुरे, फळांचा वर्षाव केले.देवस्थान परिसरात भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आले होते. सुमारे २५ हजार भाविकांच्या साक्षीने हा नेत्रदीपक मंगलमय सोहळा पार पडला.

**सर्वधर्म समभाव प्रमाणे विविध जाती - धर्मातील भाविक सहभागी झाल्याने यात्रा शिस्तबद्ध व शांततामय वातावरणात पार पडला.यंदाच्या वर्षी यात्रा उत्सवाला भाविकांची अभूतपूर्व गर्दी झाली होती. महिलांचा सहभाग सुध्दा लक्षणीय होती. रथोत्सव प्रसंगी उंच आकाशात दारुगोळ्याची मोठ्या प्रमाणात आताषबाजी करण्यात आली. यामुळे सारे वातावरण मंगलमय झाले होते. मिरवणुक मार्गावर विविध सामाजिक संघटना व भाविकांच्या वतीने प्रसाद, शरबत, पाणी व दूध वाटप करण्यात आले.**

यात्रेत विद्याधर गुरव, लक्ष्मण समाणे, अभिजित लोके यांनी सूत्रसंचालन केले.

या सोहळ्यास श्री बसवलिंग महास्वामीजी, महायुतीचे उमेदवार राम सातपुते,आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार सिध्दाराम म्हेत्रे, महेश इंगळे,मल्लिकार्जुन पाटील, दिलीप सिध्दे, बसलिंगप्पा खेडगी, मिलन कल्याणशेट्टी, अमोलराजे भोसले, अडव्होकेट अनिल मंगरुळे, मल्लिनाथ साखरे, महेश हिंडोळे, विशाल राठोड, वकिल बागवान,बसवराज अळ्ळोळी, रामचंद्र समाणे, प्रमोद पाटील, देवस्थानचे अध्यक्ष शिवनिंगय्या स्वामी, प्रकाश उण्णद, बसवराज माशाळे, स्वामीनाथ हिप्परगी, प्रशांत लोकापूरे, सुनिल गोरे, दत्तकुमार साखरे, राजशेखर उंबराणीकर,एस. एस. बिराजदार, गुलाब भिमपूरे, शिवराज स्वामी, राजेंद्र नागुरे, विरुपाक्ष कुंभार सह अनेक हजारो भाविक उपस्थित होते.विशेषतः उपविभागीय पोलिस अधिकारी विलास यामावार, पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे व अधिकारी - कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवले होते.

# आमदार राम सातपुते यांना मोहोळ मधून देणार सर्वाधिक मताधिक्य : राजन पाटील



पंढरपूर/प्रतिनिधीः देशाच्या सर्वांगीण विकास पंतप्रधान नरेंद्र मोदीच करू शकतात पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी बसवण्यासाठी महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांना मोहोळ तालुक्यातून सर्वाधिक मताधिक्य देण्यात येणार आहे असे मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांनी सांगितले भाजप आणि महायुतीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांच्या प्रचारात शनिवारी माजी आमदार राजन पाटील यांनी आमदार यशवंत माने माहितीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांनी मोहोळ विधानसभा मतदारसंघातील विविध गावांना भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला

माझ्यामदार राजन पाटील मनाली की देशाची निवडणूक आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोणत्याही भेदभाव न करता नागरिकांना मोफत अन्नधान्याची व्यवस्था केली शेतकऱ्यांचा थेट खात्यावर सहा हजार रुपये देण्याची सोय केली मोहोळ तालुक्यात चाळीसगाव तालुक्याचा पाण्याचा प्रश्न मिटवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाले असा ठाम विश्र्वास आहे त्यामुळे मोहोळ तालुक्यातून मतदारांनी भाजप आणि महायुतीचे उमेदवार आमदार रान सातपुते यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आव्हाने माजी आमदार राजन पाटील यांनी केली आमदार यशवंत माने म्हणाले की महायुती सरकारच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचा निधी राज्यात व सर्व तालुक्यात मिळाला आहे यामुळे विकासामध्ये मोठ्चा प्रमाणावर सुरू आहे कोणीही भेटून गेले तरी माजी आमदार राजन पाटील हे शब्दाची पक्के आहे त्यामुळे माहितीचे उमेदवार आमदार राम सातपुते यांचा विजय निश्र्चित आहे असे आमदार यशवंत माने यांनी प्रसंगी सांगितले यावेळी भाजप आणि माहितीचे उमेदवार आमदार राम सातपुते म्हणाले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश वेळाने प्रगती करत आहे व गावांमध्ये विकासाची कामे सुरू आहेत व देशाच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी नरेंद्र मोदी पुन्हा एकदा पंतप्रधान होण्याची आवश्यकता आहे त्यामुळे सोलापूरकरांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील महायुतीच्या पाठीशी याप्रसंगी ज्येष्ठ नेते माजी आमदार राजन पाटील आमदार यशवंत माने राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष प्रकाश चौरे भाजप जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे भाजप युवा तालुकाध्यक्ष अंकुश आवताडे लोकनेतेची संचालक संभाजीराव चव्हाण बाबुराव वाघमारे राष्ट्रवादी युवा नेते सोमनाथ धामणे सरपंच अविनाश मोठे तसेच ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते

# भाजपला मताची किंमत राहिलेली नाही: आमदार प्रणिती शिंदे

पंढरपूर/प्रतिनिधी :भाजपला तुमच्या मताची किंमत राहिलेली नाही सोलापूरच्या भाजप खासदारांनी फक्त सत्य मजा घेतली तुम्ही त्यांना खासदार केले मात्र तुम्हाला त्यांची काहीही उपयोग झालेला नाही त्यांनी तुमच्याकडून किमती मतदान घेतले परंतु त्यांना आता तुमची आणि तुमच्या मतदानाची किंमत राहिलेली नाहीये अशी टीका सोलापूर लोकसभा मतदारसंघाची महाविकास आघाडीचे उमेदवार पनीती शिंदे यांनी केली आहे

लोकसभा निवडणूक प्रचाराचा वेग आता वाढू लागला आहे महाविकास आघाडीचे उमेदवार पनीती शिंदे याना या सध्या गाव भेटदवारी करत आहेत मंगळवारी त्यांनी अक्कलकोट तालुक्यातील निमगाव मध्यगवळ बसंगा तोरणी संगम हल्ली वीज बिगर गाव बीड दौरा केला यावेळी त्यांनी भाजप सरकारच्या फसव्या धोरणा विरोधात सडकून टीका केली आहे पुढे बोलताना प्रणिती शिंदे म्हणाल्या धर्म बघून मतदान करू नका कर्म बघून मतदान करा कारण कर्म महत्वाचे आहे धर्म महत्वाचा आहे पण पूजा करताना लग्न लावताना असे प्रणिती शिंदे यांनी यावेळी सांगितले निवडणुकीच्या वेळी काम महत्त्वाचे आहे मी पंधरा वर्षापासून आमदार असून जेव्हा जेव्हा सोलापूर अडचणीत आहे त्यावेळी मी विधानसभेत आवाज उठवला आहे असे यावेळी प्रणिती शिंदे यांनी सांगितले

यावेळीमाजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे माजी कृषी सभापती मलिकार्जुन पाटील शरद पवार राष्ट्रवादी तालुका प्रमुख उमेदवार



काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष अशपाक भाई बजरंगी माजी सभापती प्रथमेश मेत्रे निमगाव जि माजी सरपंच मोहम्मद पठाण बसवराज अण्णाराव करवीर संजय बाबासाहेब पाटील माजी सरपंच विश्र्वनाथ इंटरनावरून प्रवीण खेडगाव अशोक गंगापुरे पिंटू पाटील श्रीशैल रब्बा आधी पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मंगळवेढेकरांचा निर्धार आपके बार सातपुते खासदार

# जीवात जीव असेपर्यंत कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडणार नाही: प्रशांत परिचारक

पंढरपूर/प्रतिनिधीः लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पांडुरंग परिवाराची बैठक मंगळवेढा शिव समर्थ लॉन्स येथे आयोजित करण्यात आली होती यावेळी बोलताना माजी आमदार प्रशांतराव परिचारक म्हणाले की लोकसभेची निवडणूक मोकळ्या




मनाने करायचे आहे त्यामुळे ही निवडणूक शिंदे विरुद्ध सातपुते नसून नरेंद्र मोदी विरुद्ध राहुल गांधी असे आहे

मात्र सोलापूरकरांची निवडणूक ही विकास आयोजित उमेदवार आपलाही प्रकार या मुद्द्यावरून होत आहे पाच वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चार कोटी बेगारांना घरकुल तर १३ कोटी महिलांना शौचालय दिलीप ६५ कोटी लोकांना नळाद्वारे पाणी दिले पाणी देण्याची काम नियोजन केले या मुद्द्यावर न बोलता राम सातपुते आपला की परका या मुद्द्यावर बोलले जात आहे तालुक्यातील सहा गावांच्या पाणी प्रश्र्नावर जलसंपदा मंत्री ची सही रस्त्यावर उभा करून घेतली तेरा आमदारांच्या साखर कारखान्याला अर्थसहाय्य मिळावे म्हणून ते प्रयत्नशील होते मात्र माझ्या एका टेक्स्ट मेसेजवर दामाजी कारखान्याला शंभर कोटीच्या अर्थसहाय्य उपलब्ध झाले यावेळी उमेदवार आ. राम सातपुते म्हणाली की मी सामान्य कुटुंबातील शेतकऱ्यांचा मुलगा असल्यामुळे या मतदारसंघातील कार्यकर्त्यांचा सन्मान ठेवला जाईल मोदींनी जिल्ह्याच्या विकासासाठी कामे केली मंगळवेढा पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील ८० हजार मतांच्या ताकदीवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांचा शब्द म्हणून भाजपचा आमदार करून दाखवला त्यामुळे जीवात जीव असेपर्यंत मी कार्यकर्त्याला वारंवार सोडणार नाही आणि उद्याचा दिवस हा पांडुरंग परिवाराचा असल्यामुळे कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आव्हान माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी व्यक्त केली लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर पांडुरंग परिवाराचे बैठक शिव समर्थ लॉन्स येथे आोजित करण्यात आली होती त्यावेळी ते बोलत होती

# सारथी संस्थेचे वीस विद्यार्थी युपीएससीच्या अंतिम गुणवत्ता यादीत

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षा २०२३ चा अंतिम निकाल जाहीर झाला. त्यात पुणे येथील सारथी संस्थेमार्फत मुलाखतीसाठी प्रायोजित ४५ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थ्यांची अंतिम गुणवत्ता यादीत निवड झाली आहे. यामध्ये ४ विद्यार्थिनींचा समावेश आहे. पुणे जिल्ह्यातून ६, नाशिक जिल्ह्यातून ५, अहमदनगर जिल्ह्यातून २ तसेच कोल्हापूर, बुलढाणा, जळगाव, अकोला, वाशिम, हिंगोली, व सातारा जिल्ह्यातील प्रत्येकी एक विद्यार्थी यशस्वी झाला आहे, अशी माहिती सारथी संस्थेचे उपव्यवस्थापकीय संचालक तथा उपजिल्हाधिकारी अनिल पवार यांनी दिली.सारथी संस्थेने मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी ह्या लक्षित गटातील होतकरू विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) परिक्षेच्या तयारीकरिता विद्यावेतन देऊन नवी दिल्ली व पुणे येथील नामांकित कोचिंग संस्थेत निःशुल्क प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली होती. युपीएससी मुलाखतीच्या तयारीकरिता ४५ विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण नियोजित करून तज्ज्ञांमार्फत विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन देण्यात आले. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी ह्या लक्षित गटाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी काम करते. लक्षित गटातील उमेदवारांना स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळून विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता सारथी संस्था प्रयत्नशील आहे. सारथीमार्फत युपीएससीकरिता लाभ घेऊन यश मिळविलेल्या २० विद्यार्थ्यांची नावे व रँक क्रमांक पुढीलप्रमाणे :- विनय सुनील पाटील (१२२) नाशिक, आशिष आशोक पाटील (१४७) काल्हापूर , ठाकरे ऋषिकेश विजय (२२४)अकोला , शामल कल्याणराव भगत (२५८) पुणे ,उन्हाळे आशिष विद्याधर (२६७) बुलढाणा , निरंजन महेंद्रसिंह जाधवराव (२८७) पुणे ,घोगरे हर्षल भगवान (३०८) पुणे , शुभम भगवान थिटे (३५९ ) पुणे ,अंकित केशवराव जाधव (३९५ ) हिंगोली , खिलारी मंगेश पराजी (४१४) अहमदनगर , पाटील लोकेश मनोहन (४९६) जळगाव , मानसी नानाभाऊ साकोरे (५३१ )पुणे , आविष्कार विजय डेर्ले (६०४) , नाशिक , केतन आशोक इंगोले ( ६१०) वाशिम , देशमुख राजश्री शांताराम (६२२) अहमदनगर, निकम सुरज प्रभाकर (७०६) नाशिक , कुणाल संजय अहिरराव (७३२) नाशिक , गौरी शंकर देवरे ( ७५९) पुणे , शुभम उत्तमराव बारकाळे ( ८३७) नाशिक , श्रवण अमरसिंह देशमुख ( ९७६), सातारा. हे विद्यार्थी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परिक्षेत यशस्वी झाले आहेत.

मागील तीन वर्षात सारथी संस्थेमार्फत ५८ विद्यार्थी युपीएससी परीक्षेत यशस्वी झाले आहेत, तर यावर्षी २० विद्यार्थी यशस्वी झाले असुन आतापर्यंत एकुण ७८ विद्यार्थी युपीएससी परिक्षेत यशस्वी झाले आहेत. सारथी संस्थेचे अध्यक्ष अजित निंबाळकर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले, तर यशस्वी विद्यार्थ्यानी उत्तम प्रशासन करून या देशाच्या विकासात महाराष्ट्राचा ठसा उमटावा अशा शुभेच्छा सारथी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांनी दिल्या आहेत.